# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICTION / 58 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–10092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

**''वाहतूक नियंत्रण अधिसुचना''**

ठाणे ( पुर्व ) कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीतील गणेश मुर्तीचे गणेश घाट मिठबंदर येथे विसर्जन होत असते. कोपरी येथील गणेश मुर्ती कोपरी सर्कल कडुन हसिजा मार्गे ट्रिन्स हॉटेल, आनंद सिनेमा–टि.एम.टी स्टॅन्ड– अष्टविनायक चौका कडुन गणेश घाट मिठबंदर येथे विसर्जनासाठी जात असतात. सदर गणेश विसर्जनाचे वेळी विविध गणेश मंडळांचे सोबत ट्रक, टेम्पों, हातगाडया या सारखी वाहने असतात, तसेच जनसमुदाय मोठया प्रमाणात असतो. अशा वेळी ठाणे स्टेशन पुर्व हसिजा कॉर्नर – आनंद सिनेमा –सिमला ज्युस सेंटर – टि.एम.टी स्टॅन्ड तसेच अष्टविनायक चौकापर्यन्तचा रस्ता अरुंद असल्याने वाहतूकीची कोंडी होत असते.

त्याचप्रमाणे गोखले रोड नौपाडा येथे टेलीफोन नाका ते हायमास – गावदेवी मंदिराकडुन तलावपाळी विसर्जन घाटाकडे जाणारे गणेशविसर्जन मिरवणुकांचे प्रमाण देखील अधिक असते. अशा वेळी गणेश मिरवणुका पाहणारे नागरीकांची गर्दी होवुन मोठया प्रमाणात जनसमुदाय गोळा होत असतो. त्यावेळी नौपाडा गोखले रोड परिसरात रस्त्याचे कडेला चार चाकी व दुचाकी वाहने पार्क होत असल्यामुळे वाहतुकीस तसेच मिरवणुकींना अडथळा निर्माण होतो. तरी सदर मार्गावरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी, वाहतुक व्यवस्था सुरळीत व सुरक्षित राहण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी,

मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर मला मोटार वाहन कायदा सन १९८८ (मो.वा.का.१९८८ चा ५९ वा कायदा ) चे कलम ११५, सह शासकीय अधिसुचना क्रं. मो.वा.का.०५८९ सी.आर.१०६९ टि.आर.अे.–२ दिनांक १९/०५/१९९० एम.जी.जी. ४ अे दिनांक २०/०९/१९९० अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे वाहतुक अधिसुचना जारी करीत आहे:–

१) दिनांक १७/९/२०१८ रोजी गौरी गणपती विर्सजन व दिनांक २३/९/२०१८ रोजी गणेशमुर्ती विर्सजन संपेपर्यत कोपरी सर्कल ते कोपरी शहरात कंपनी बसेस /खाजगी बसेस तसेच टी एम टी ,एन एम टी , बी एस टी ,ठाणे मनपा तसेच वसई–विरार महानगरपालीकेच्या बसेस व इतर अवजड वाहने यांना येण्यास प्रवेश बंद राहील. व त्या कोपरी सर्कल येथुनच वळवुन त्यांना त्यांचे गंतव्य स्थाना कडे रवाना करण्यात येईल.

२) कोपरी सर्कल ते गोकुळधाम सोसायटी पर्यन्त कंपनी व खाजगी बसेस व इतर अवजड वाहने, यांना पार्कीग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) तसेच गोखले रोड येथे दुचाकी व चार चाकी वाहनांना सकाळी ०७.०० ते १५.०० व विरूध्द बाजुस १५.०० ते २४.०० वा पावेतो पार्कीग देवुन इतर ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहनांना पार्कींग करीता मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दिनांक १७/९/२०१८ रोजी गौरी गणपती विर्सजन व दिनांक २३/९/२०१८ अनंत चतुर्दशी रोजी दुपारी १४.०० वाजेपासुन त्या दिवशीचे गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यन्त अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिद्धी अधिकारी ठाणे
२/— सदरची अधिसुचना प्रसिद्ध करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१,ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

प्रत:— <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे</u>
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.कोपरी व नौपाडा वाहतूक उपविभाग</u>.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

प्रत :— खाजगी बस व कंपनी प्रवासी वाहतूक संघटना.